महाराष्ट्र पोलीस

# रामानंद नगर पोलीस स्टेशन, जळगांव.

फोन नं.- ०२५७-२२८२८६४

ईमेल- piramanandnagar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट.

दि.२९/०४/२०२५

## जळगांव शहरात सेंट जोसेफ शाळेजवळ गोळीबार करणारे सराईत आरोपी गावठी कट्टा व हत्यारांसह जेरबंद, रामानंद नगर पोलीस स्टेशनची कामगिरी.

प्रस्तुत बातमीची हकिकत अशी की, दि-२४/०४/२०२५ रोजी सायंकाळी ०९.३० वा. चे सुमारास सेंट जोसेफ शाळेसमोरील मीनाताई ठाकरे मार्केट येथे यातील फिर्यादी महेंद्र समाधान सपकाळे, वय २० वर्षे, व्यवसाय- शिक्षण, रा.प्रबुध्द नगर, पिंप्राळा, जळगांव ता.जि. जळगांव हे आपला मित्र भुषण अहिरे याचा वाढदिवस साजरा करण्याकरीता येथे आले होते. यातील फिर्यादी आणि आरोपी यांचे पुर्व वैमनस्य असल्याने खालील आरोपी यांनी सदर ठिकाणी येऊन हातामध्ये कोयते आणि देशी बनावटीचा गावठी कट्टा घेऊन फिर्यादी यांचे वर फायरींग करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असता त्यामध्ये यातील फिर्यादी यांना पाठीमागील बाजुस कमरेच्या खाली गोळी लागल्याने ते जखमी झाले यातील फिर्यादी नामे महेंद्र समाधान सपकाळे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन रामानंद नगर पोली स्टेशन येथे गुरंनं १६७-२०२५ भा.न्या.सं. २०२३ चे कलम १०९,११५ (२),१८९ (२),१९०, १९१ (२), १९१ (३), ३५१(३), ३५२ सह शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३,२५ सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१), (३) प्रमाणे दि-२५/०४/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी नामे १) **विशाल भिका कोळी**, (पिस्टल सह) २) अक्षय उर्फ बाब्या बन्सीलाल धोबी, ३) धिरज उर्फ वैभव उर्फ गोलु कोळी, ४) सागर अरुण भोई उर्फ जाडया भोल्या, ५) नितेश मिलिंद जाधव, ६) गिरिष किशोर घुगे यांना अटक करण्यात आली असुन आरोपी गिरिष किशोर घुगे याचे कडुन गावठी बनावटीचे पिस्टल हस्तगत करण्यात आले आहे. तसेच सदर गुन्हयातील घटनास्थळावरुन एक जिवंत काडतुस(राऊंड), दोन खाली केस व कोयता हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच मागील रेकॉर्ड काढला असता सदर गुन्हयातील आरोपी नामे **विशाल भिका कोळी** याचे वर जळगांव शहरात तसेच रामानंदनगर पोलीस स्टेशन अंतर्गत ११ गुन्हे दाखल असुन त्याचेवर म.पो.का.कलम ५६ (१)(ब) प्रमाणे तसेच MPDA अंतर्गत प्रतिबंधक कारवाई देखील करण्यात आली आहे. व आरोपी नामे **अक्षय उर्फ बाब्या बन्सीलाल धोबी** याचे वर जळगांव शहरात तसेच रामानंदनगर पोलीस स्टेशन अंतर्गत ०८ गुन्हे दाखल असुन त्याचेवर म.पो.का.कलम ५६ (१)(ब) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच आरोपी नामे **नितेश उर्फ गोल्या मिलिंद जाधव याचे विरुध्द** जळगांव शहरात तसेच रामानंदनगर पोलीस स्टेशन अंतर्गत १५ गुन्हे दाखल असुन त्याचेवर म.पो.का.कलम ५६ (१)(ब) प्रमाणे तसेच MPDA अंतर्गत प्रतिबंधक कारवाई देखील करण्यात आली आहे

सदरची कार्यवाही ही मा.पोलीस अधिक्षक डॉ महेश्वर रेड्डी, मा.अपर पोलीस अधिक्षक अशोक नखाते, मा.उपविभागीय पोलीस अधिकारी संदीप गावित, पोलीस निरीक्षक राजेंद्र गुंजाळ यांचे मांदर्शनाने सपोनि/संदिप बाघ, पोउपनि/प्रदिप बोरुडे, सफो/संजय सपकाळे, पोहेकॉ/जितेंद्र राजपुत, पोहेकॉ/जितेंद्र राठोड, पोहेकॉ/सुशिल चौधरी, ,पोहेकॉ/इरफान मलिक, पोना/मनोज सुरवाडे, पोना/रेवानंद साळुखे, पोना/हेमंत कळसकर, पोना/विनोद सुर्यवंशी, पोकॉ/उमेश पवार, पोकॉ/रविंद्र चौधरी, पोकॉ/प्रविण सुरवाडे यासर्वांनी सदर गुन्हा उघडकिस आणणेकरीता महत्वाची भुमीका पार पाडली आहे.

सदर गुन्हयाचा पुढील तपास मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाने रामानंद नगर पोलीस स्टेशन येथील पोलीस उपनिरीक्षक, प्रदिप बोरुडे करीत आहेत.

पोलीस निरीक्षक,

रामानंद नगर पो.स्टे.जळगांव

